बीड । बुधवार
०५.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३२६
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 



# धनंजय मुंडे चा राजीनामा

## आरोपींना सोडा आम्ही न्याय करु, आरोपींना ठेचून मारा; देशमुखांबरोबर केलेल्या कौर्यकृत्याचा बीड जिल्हात संताप

- बाजारपेठा ओस, अत्यावश्यक सोडता उर्वरित बंद
- बीड, धारुर, केज, वडवणी दुचाकी फेरी काढून बंदचे आवाहन
- चौकाचौकांत कार्यकर्ते जमून निषेध घोषणा
- मनोज जरांगे पाटलांनी घेतली देशमुख कुटूंबियांची भेट
- परळी, माजलगावला बाजारपेठा सुरळीत
- आठवडी बाजारपेठांच्या गावांतही बंद









**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण केल्यानंतर त्यांना झालेली मारहाण ही कौर्याची परिसिमा पार करणारी होती. आरोपी कौर्यकृत्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी संतोष देशमुख यांच्यासोबत घृणास्पद कृत्य करुन त्याचा असुरी आनंदही घेतला. याबाबतचे फोटो समोर येताच जिल्ह्यात संतापाची लाट उसळली.

या संतापामुळेच सोमवारी रात्री उशिरा बंदची घोषणा करुन मंगळवारी (ता. चार) जिल्ह्यात बंद पाळण्यात आला. आठवडी बाजारपेठांच्या गावांत देखील बंद पाळण्यात आला. परळी व माजलगाव वगळता उर्वरित जिल्ह्यात बंदला मोठा प्रतिसाद मिळाला. संतोष देशमुख यांचे दिनांक ०९ डिसेंबर२०२४ रोजी अपहरण करुन हत्या करण्यात आली. वाल्मीक कराडने अवादा कंपनीला मागीतलेल्या दोन कोटी रुपयांच्या खंडणीला आड आल्यानेच संतोष देशमुख यांची हत्या झाल्याचे गुन्हे अन्वेषण विभागाच्या आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस उपमहानिरीक्षक डॉ. बसवराज तेली यांच्या अध्यक्षतेखालील विशेष तपास पथकाच्या तपासातून समोर आले.

खुन, खंडणी व ॲट्रॉसिटी या तीन गुन्ह्यांतचा तपास केल्यानंतर या गुन्ह्यांची साखळी खंडणी व त्यातूनच खुन झाल्याचे उघड झाले. दरम्यान, विशेष तपास पथकाने न्यायालयात दाखल केलेल्या दिड हजार पानांच्या दोषारोपत्रासोबत काही पुरावेही जोडले. या पुराव्यांत डिजीटल पुराव्यांमध्ये संतोष देशमुख यांना मारहाणीच्या व्हिडीओ चित्रणाचे स्क्रीनशॉट जोडण्यात आले. याचे फोटो समोर येताच संतापाची सर्वत्र लाट उसळली. दरम्यान, सकाळी लवकरच उपचार घेत असलेले मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील मस्साजोगला दाखल झाले. त्यांनी देशमुख कुटूंबियांची भेट घेत धीर दिला. बीडमध्ये तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकातून दुचाकी फेरी काढून बंदचे आवाहन केले. त्यानंतर दुकाने, बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या. वैद्यकीय सेवांसह इतर अत्यावश्यक सेवा, वाहतूक, शाळा, महाविद्यालये हातगाड्यांवरील व्यवसाय सोडता पुर्णपणे बंद पाळण्यात आला. अंबाजोगाई, केज, माजलगाव, वडवणी, धारुर, शिरुर कासार, पाटोदा, आष्टी व गेवराईतही बंद पाळण्यात आला. राज्य मार्ग व महामार्गांवरील हॉटेलही बंद दिसून आले. शहरांमध्ये दुचाकींवर फेऱ्या काढण्यात आल्या.

### ● पवार, मुंडेंच्या छायाचित्रांच्या बॅनरचे दहन ●

**दरम्यान, केजमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या छायाचित्रांचे बॅनर आणि टायर जाळून देशमुख यांच्या चाहत्यांनी निषेधाच्या घोषणा दिल्या.**

### ● ठेचून मारा, आम्ही न्याय करु ; नेटकरी संतापले ●

**संतोष देशमुख यांच्यासोबत कौर्यकृत्य व घृणास्पद कृत्य करणाऱ्या सुदर्शन घुले, प्रतिक घुले, जयराम चाटे, सुधीर सांगळे, महेश केदार यांचे सदर फोटो सोमवारी (ता. तीन) उशिरा समोर आल्यानंतर पुन्हा एकदा सर्वत्र संतापाची लाट उसळली. आरोपींना सोडा आम्ही न्याय करु, आरोपींना ठेचून मारा, आरोपींचे समर्थन करणाऱ्यांनो डोळे उघडून बघा, अशा संतप्त प्रतिक्रिया सोशल मिडीयावर उमटत होत्या..**

## बीड बंदला केजमध्ये हिंसक वळण, ११ तालुक्यात दुकानांना टाळी, रस्त्यावर शुकशुकाट





## भर चौकात शंभर गोळ्या घाला ; संतोष देशमुखांचे फोटो पाहून मनोज जरांगे संतापले



भमनोज जरांगे पाटील म्हणाले, संतोष अण्णाला कपडे काढून मारलं, त्यांचे फोटो पाहून काळीज हेलावून जातंय. एवढी क्रूरता करण्याचं धाडसं कसं झालं? आता तरी अजित पवार आणि फडणवीस यांनी धनंजय मुंडे यांना लाथ मारुन बाहेर काढावं, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली. धनंजय मुंडे यांनी स्वतः हून आमदारकीसह सगळ्याच पदांचा राजीनामा द्यावा, स्वतःहून जेलमध्ये जावं अशी मागणीही जरांगे पाटील यांनी केली. मनोज जरांगे पाटील म्हणाले, ''धनंजय मुंडे यांच्यावर जर भगवानबाबांचे संस्कार असतील, स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे संस्कार असतील तर मनाने आमदारकीसह सर्व पदांचा राजीनामा द्यावा आणि यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीपाशी जाऊन राजीनामा दे. तू स्वतःहून जेलमध्ये जा. अजित पवार आणि देवेंद्र फडणवीसांनी मुंडेंना लाथ मारून बाहेर काढावं. असं जर केलं नाही तर थू तुमच्या जिंदगीवर, असंही जरांगे पाटील म्हणाले.

## आजचा राजीनामा ही एक प्रकारची कबुलीच: संभाजीराजे



मुंबई : बीडमधील संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर या घटनेचे थरकाप उडवणारे फोटो व्हायरल झाले आहेत. संतोष देशमुख यांना अंतर्वस्त्रावर बसवून आरोपींनी राक्षसी वृत्तीने मारहाण केल्याचे फोटो माध्यमातून समोर आल्यानंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्यानंतर, राजकीय दबाव वाढताच मंत्री धनंजय मुंडेंनीआपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. मुंडेंच्या राजीनाम्यानंतरही राज्यभरातून तीव्र भावना व्यक्त होत असून गेल्या अडीच महिन्यांपूर्वीच हा राजीनामा घ्यायला हवा होता, असे विरोधकांकडून म्हटले जात आहे. तर, मंत्री पकंजा मुंडेंनीही राजीनाम्यावर आपली भूमिका स्पष्ट केली असून, धनंजयला मंत्रिपदच द्यायला नव्हते पाहिजे, असेही त्यांनी म्हटले. आता, स्वराज्य पक्षाचे संस्थापक व माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर परखड भूमिका मांडली. तसेच, मंत्रिपदाचे कवच घालून तुम्ही आरोपपत्र दाखल करण्याची वाट पाहात होता का, असा सवालही संभाजीराजेंनी विचारला आहे.

## आधीच राजीनामा व्हायला पाहिजे होता : पंकजा मुंडे



चुलत भाऊ धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर पंकजा मुंडे यांची प्रतिक्रिया आली आहे. काल काही व्हिडिओज सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. संतोष देशमुख यांच्या हत्येचे ते व्हिडिओ होते. ते व्हिडिओ उघडून पाहण्याची सुद्धा माझी हिम्मत झाली नाही. या प्रकरणातल्या गुन्हेगारांना कडक शिक्षा व्हावी हीच माझी मागणी आहे. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याचे स्वागत आहे. पण हा राजीनामा फार आधी व्हायला पाहिजे होता. राजीनामा घेणाऱ्यांनी सुद्धा आधीच राजीनामा घ्यायला पाहिजे होता, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. एकप्रकारे पंकजा यांनी महायुती सरकारला घरचा आहेर दिला आहे.

## संतोष आण्णांच्या हत्येचे फोटो पाहून राज्यभर संताप: खा.सोनवणे



संतोष आण्णांच्या हत्येचे फोटो पाहून राज्यभर संताप आणि दुःख व्यक्त होत आहे. मात्र, हे फोटो पाहून त्यांच्या कुटुंबियांची काय अवस्था झाली असेल, याची कल्पनाही करवत नाही! आज मस्साजोग येथे जाऊन धनंजय देशमुख व त्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली, या कठीण काळात आम्ही देशमुख कुटुंबासोबत आहोत. खा. बजरंग सोनवणे यासह हत्या झाल्यापासून ते आतापर्यंत खा.बजरंग सोनवणेंनी यासंदर्भात आवाज उठवून या प्रकरणात देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. आजपर्यंत ज्या ज्या आरोपींवर कठोर शासन झालं, ज्या दबावातून मुंडेंचा राजीनामा झाला या सर्वांमध्ये सोनवणे यांचासुद्धा मोठा वाटा आहे. यापुढे सुद्धा बजरंग सोनवणेंनी देशमुख परिवाराला न्याय द्यावा अशी मागणी होत आहे.

## धनंजय मुंडे हे आकाचे आका : आमदार सुरेश धस



''संतोष देशमुख यांना एवढ्या क्रूरपणे मारले आहे. त्यामुळे या सर्व लोकांना फाशीची शिक्षाच झाली पाहिजे. धनंजय मुंडे हे आकाचे आका आहेत. त्यांच्या पाठिंब्याशिवाय ही घटना झालेली नाही. या प्रकरणातील जे तरुण आहेत, त्यांना वाटत होतं की विष्णू चाटे हा आमचा बॉस आहे आणि आका आमचा बाप आहे. वाल्मिक कराड हा बीड जिल्ह्याचा बाप झाला होता. संतोष देशमुख यांना मारहाण करताना सुदर्शन घुले म्हणत होता की, मी तुझा बाप आहे असं म्हण, नाही तर मी पुन्हा मारेन. या सर्वांचे आका हे धनंजय मुंडे होते. त्यामुळे त्यांचा राजीनामा घेणे आवश्यक होते,'' असं सुरेश धस यांनी म्हटलं. देवाची गाठी लागत नाही पण न्याय मिळतो ''काल वायरल झालेल्या फोटोची माहिती मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी घेतली असावी आणि त्याच्यामुळे त्यांचा राजीनामा घेण्यात आलेला आहे.

## धनंजय मुंडे यांना सहआरोपी करायला हवं : रोहीत पवार



'सरकारला असं वाटतंय की इतके आमदार निवडून आले आहेत की लोकांनी विरोध करो किंवा आंदोलन करु किंवा विरोधकांनी विरोध करो किंवा आंदोलन करावे काहीही फरक त्यांना पडत नव्हता. पण लोकांनी तीव्र निषेध केल्यानंतर आणि देशमुख परिवाराने जो लढा लढला त्यामुळेच सरकारला झुकावे लागले. दुर्दैव इतकंच आहे की एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर तो व्यक्ती परत येऊ शकत नाही, पण न्याय मिळायला सुरुवात झाली, असं आपल्याला म्हणावं लागले. असाच न्याय आपल्याला सुर्यवंशी कुटुंबालाही द्यायचा आहे. पण देशमुख कुटुंबाची आणि सर्वसामान्यांची अजून एक मागणी आहे की धनंजय मुंडे यांना सहआरोपी करायला हवं. कारण त्या कंपनीकडून पैसे मागण्याची बैठक ही धनंजय मुंडेंच्या घरी झाली होती, असं भाजपचा आमदार पुराव्यासह जर म्हणत असेल तर मग सहआरोपी करुन पारदर्शकपणे याची चौकशी होणं तितकंच महत्त्वाचे आहे'', असेही रोहित पवारांनी म्हटले.

## वाल्मीक कराडसह सर्व आरोपींना फासावर चढवा: आ.संदीप क्षीरसागर



धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा ही प्रकरण उघडकीस आल्यापासूनची आमची मागणी होती. ती आता पूर्ण झालेली आहे. कारण वैयक्तिक वाल्मिक कराड स्वतः एवढा मोठा नाही की, त्याच्यावर गुन्हा दाखल व्हायला इतका वेळ लागतो. त्याच्या सांगण्याप्रमाणे प्रशासनातील अधिकारी काम करतात. यामागे निश्चित धनंजय मुंडे यांची राजकीय शक्ती होती. त्यामुळे धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणे क्रमप्राप्त ठरत होते. परवा तपास यंत्रणांकडून दाखल केलेल्या चार्जशीट मधील स्व.संतोष देशमुख यांना मारहाण केल्याचे फोटो आणि व्हिडिओ समोर आले. अक्षरशः काळजाला पीळ पडावा असे ते सगळी दृश्य आहेत.



# देश आणि समाजाच्या विकासात योगदान द्या : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन






पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी, रोजगार निर्मितीसाठी आणि लाखो लोकांच्या उपजीविकेसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या कृषी संलग्न क्षेत्राचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी देश आणि समाजाच्या विकासात अनन्यसाधारण योगदान देण्याचे आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी येथे केले.

सेमिनरी हिल्स येथील पशुवैद्यक महाविद्यालयाच्या रजत जयंती सभागृहात महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या बाराव्या पदवीदान कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून राज्यपाल बोलत होते. यावेळी विद्यापीठाच्या प्र-कुलपती आणि पशुसंवर्धन, पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, प्रख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., माफसूचे कुलगुरु डॉ. नितीन पाटील, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (पशुविज्ञान) डॉ. शिरीष उपाध्ये, कुलसचिव मोना ठाकुर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी व पालक उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले की, समाजाचीही आपल्याकडून अपेक्षा असते. उपस्थित विद्यार्थ्यांचा समर्पणभाव आणि उत्साह पाहून तुमचे योगदान हे निश्चितच आशादायी राहील. २०४७ पर्यंत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे देशाला जगातील अव्वल क्रमांक करण्याचे स्वप्न पूर्ण करण्यात आपले योगदान महत्वपूर्ण राहणार आहे. फळाची अपेक्षा न करता आपण कर्म करीत राहण्याची गरज आहे. कठोर परिश्रम कायम ठेवावे. भगवद्गीतेमध्येही हेच मर्म सांगितले आहे. संयमाशिवाय यशाचा मार्ग प्रशस्त होत नाही. महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडणे हा शेवट नसून एक नवीन सुरुवात आहे. अधिक कठोर प्रसंगांचा येत्या काळात सामना करावा लागेल. शिक्षण घेऊन बाहेर पडल्यानंतरची आव्हाने वेगळी असतात. त्याचा निश्चयाने सामना करण्याची गरज असल्याचे राज्यपाल म्हणाले.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ हे केवळ पशुवैद्यक विज्ञान, दुग्ध तंत्रज्ञान आणि मत्स्यविज्ञान या क्षेत्रांत विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या उत्कृष्ट विद्याशाखांमुळेच वैशिष्ट्यपूर्ण नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रभर विस्तारलेल्या १० हून अधिक घटक महाविद्यालयांमुळेही सतत अग्रेसर करीत आहे. याशिवाय, शेतकरी आणि संबंधितांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व मदत पोहोचवण्यासाठी अलीकडेच स्थापित केलेल्या कृषी विज्ञान केंद्रांच्या पाठबळामुळे हे विद्यापीठ अधिक सक्षम आणि प्रभावी बनले असल्याचे राज्यपाल पुढे म्हणाले.

विद्यापीठाच्या प्र-कुलपती आणि पशुसंवर्धन, पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनीही आपले विचार व्यक्त केले. राज्यात सह्याद्रीच्या डोंगररांगांपासून कोकणच्या किनाऱ्यापासून ते विदर्भ आणि मराठवाड्याच्या विस्तीर्ण मैदानापर्यंत पसरलेली समृद्ध जैवविविधता आहे. विद्यापीठाचे पदवीधर हे राज्यातील आणि देशातील प्राणी संपदा, दुग्ध व्यवसाय आणि मत्स्य जैवविविधतेचे खरे संरक्षक आहेत. विज्ञानाचा प्रसार करण्याबरोबरच शेतकरी, ग्रामीण तरुण आणि महिलांसारख्या शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत त्याचा लाभ पोहोचवण्याची आहे. तुमच्या ज्ञानाने आणि शिकलेल्या कौशल्याने समाज आणि राज्यासाठी एक महत्वपूर्ण बलस्थान सिद्ध व्हावे, असे मंत्री पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. ज्येष्ठ शास्त्रज्ञ अनिल काकोडकर म्हणाले की, ग्रामीण समृद्धी ही केवळ चांगल्या रस्त्यांवर आणि विजेवर अवलंबून नाही तर ती शाश्वत उपजीविका, आर्थिक स्वावलंबन आणि प्रत्येक कुटुंबाला सकस पोषण व सन्मानजनक जीवनमान मिळेल यावर आधारित असते. या दृष्टीने पशुधन क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, शेळीपालन व मेंढीपालन हे केवळ व्यवसाय नाहीत, तर ती कोट्यवधी लोकांसाठी जीवनाधार आहेत. जर आपण या क्षेत्राला बळकटी दिली, तर आपोआप ग्रामीण भारत मजबूत होईल.

साहिलला सर्वाधिक नऊ पदके- समारंभात एकूण ७०३ पदवीधारकांना पदवी प्रदान करण्यात आली. ज्यामध्ये पशुवैद्यक शाखेचे ३८० स्नातक विद्यार्थी, मत्स्य विज्ञान शाखेचे ५७ स्नातक विद्यार्थी, दुग्ध तंत्रज्ञान शाखेचे ५३ स्नातक विद्यार्थी, पशुविज्ञान शाखेचे २०५ स्नातकोत्तर विद्यार्थी, दुग्ध तंत्रज्ञान शाखेचा १ स्नातकोत्तर विद्यार्थी आणि पशुविज्ञान शाखेच्या ७ आचार्य विद्यार्थ्यांचा समावेश आहे. दीक्षांत समारंभात साहिल या विद्यार्थ्यास सर्वाधिक नऊ पदके मिळाली. नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाचा विद्यार्थी साहिल याने एकूण ६ सुवर्ण आणि ३ रौप्य पदके प्राप्त केली. दीक्षांत समारंभात गुणवंत पदविधारकांना ३० सुवर्ण, ०८ रौप्य पदके आणि १ रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

# आला उन्हाळा, तब्येत सांभाळा व उष्माघात टाळा..!

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, सध्या वातावरणातील होणाऱ्याब दलामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे.त्यामुळे मार्च महिन्यापासूनच अनेक भागात तापमान वाढत आहे. जिल्ह्याच्या तापमानाचा पारा देखील वाढतो आहे. सर्व साधारणपणे एखाद्याप्रदेशात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान ३ अंश सेल्शियसने जास्त असेल तर त्याला उष्णतेची लाट असे संबोधतात किंवा सलग दोन दिवस एखाद्या भागात तापमान ४५ अंश सेल्शियसपेक्षा जास्त असेल तर त्याभागात उष्णतेची लाट आली असे म्हटले जाते. सर्वसाधारणपणे प्रामुख्याने प्रत्येक वर्षी एप्रिल, मे, जुन या महिन्यात उष्माघाताचा प्रादुर्भाव होत असतो. परिणामी, उष्माघातामुळे मृत्यू होण्याची शक्यता असते.



**उष्माघातासाठी अती जोखमीचे घटक-** उन्हात बाहेर कष्टाची कामे करणारे लोक, वृद्ध व्यक्ती व लहान मुले, गरोदर महिला , स्थूल व्यक्ती व पुरेशी झोप न झालेले व्यक्ती , मधुमेह, हृदयविकार, दारूचे व्यसन असणारे लोक , घट्ट कपडे घातलेले लोक, निराश्रीत, बेघर लोक , कारखान्यात बॉयलर जवळ काम करणारे लोक अशा अति जोखमीच्या लोकांना उष्माघाताचा धोका अधिक असतो. अतिजोखमीच्या लोकांनी उष्णतेच्या लाटेसंदर्भात विशेष काळजी घेतली पाहीजे. उष्णतेमुळे होणारा शारीरिक त्रास किरकोळ स्वरूपाचा किंवा गंभीर स्वरूपाचा असतो.

**लक्षणे-** किरकोळ त्रासात उष्णतेमुळे थकवा येणे, ताप येणे, शरीरावर रॅश उमटणे, हातापायाला गोळे येणे, चक्कर येणे अशी लक्षणे दिसतात. तर गंभीर त्रासात उष्माघातामुळे त्वचा कोरडी पडणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैनी व अस्वस्थता, बेशुध्द अवस्था अशा लक्षणासह मृत्यूही होऊ शकतो.

**प्रतिबंधात्मक उपाय हे करा -** पुरेसे पाणी प्या, प्रवासात पाणी सोबत ठेवा, हलक्या वजनाचे फिकट रंगाचे (पांढरे) सैलसर कपडे वापरा. उन्हात चष्मा, छत्री, टोपी व पादत्राणे वापरा. ओलसर पडदे (वाळ्याचे), पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवा. शक्य असल्यास उन्हात जाण्यापुर्वी सनस्क्रिन क्रिम वापरा किंवा कोरफडीचा गर लावा. सरबत किंवा जलसंजीवनीचा वापर करा.

**हे करू नये -** कष्टाची कामे उन्हात करू नका. शक्यतो उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाणेटाळा. लहान मुलांना पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नका. गडद रंगाचे तंग कपडे वापरू नका. मद्यपान, चहा, कॉफी, शीतपेय टाळा. खुप प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. उन्हाच्या काळात भर दुपारी स्वयंपाक करणे टाळा व स्वयंपाक घर हवेशीर ठेवा.

**प्रथोमचार-** रुग्णास वातानुकुलीत खोलीत ठेवावे अथवा हवेशीर खोलीत ठेवावे. खोलीत पंखे, कुलर ठेवावे. रुग्णाचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. रुग्णास थंड पाण्याने आंघोळ घालावी, रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात. आईसपॅक लावावेत. रुग्णाला जवळच्या आरोग्य केंद्रात घेऊन जावे.

**आरोग्य विभाग सज्ज-** येऊ घातलेल्या उन्हाळ्यात उष्माघात प्रतिबंध व नियंत्रणाकरिता आरोग्य विभागाची पूर्वतयारी पूर्ण झालेली असून सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघात कक्ष कार्यान्वित करण्यात आले असून आवश्यक औषधीसाठा उपलब्ध करून आरोग्य यंत्रणा सतर्क व सज्ज ठेवण्यात आलेली आहे.

**प्रशासनाचे नागरिकांना आवाहन-** हवामान खात्याच्या अंदाजानुसार, आगामी दिवसांमध्ये जिल्ह्यात उष्णतेची लाट जाणवू शकते, अशा परिस्थितीत उष्माघात होऊ नये, यासांठी नागरिकांनी आता पासूनच सजग रहावे व प्रतिबंधात्मक उपायावर अधिक भर द्यावा. तसेच, उष्माघाताची लक्षणे जाणवू लागल्यास तातडीने जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार करून घ्यावे.

# 'बालस्नेही पुरस्कार 2024' चे वितरण; राज्य बाल हक्क संरक्षण आयोग अधिक सक्षम करणार: महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे




**मुंबई । प्रतिनिधी**

बालकांना सुरक्षित, सक्षम आणि विकसित करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी केले. राज्य बालहक्क संरक्षण आयोग अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात येत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

बाल संरक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी आणि यंत्रणांचा सन्मान करण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्यावतीने 'बालस्नेही पुरस्कार २०२४' समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री पंकज भोयर, आमदार संजय केळकर, आमदार मनीषा कायंदे, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग पोलीस अपर महासंचालक अश्वती दोर्जे, आयोगाचे माजी आयुक्त प्रशांत नारनवरे, आयोगाचे सचिव लक्ष्मण राऊत यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. अवर सचिव वंदना जैन, शिक्षण अधिकारी माधुरी भोसले, सदस्य नीलिमा चव्हाण, जयश्री पालवे, सायली पालखेडकर, संजय सिंगल, चैतन्य पुरंदरे, आदिसह जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्त, पोलीस अधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

बालकांच्या सुरक्षेसाठी पारदर्शक यंत्रणा: अध्यक्ष सुशीबेन शाह- आयोगाच्या अध्यक्ष सुशीबेन शाह म्हणाल्या की, महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी पारदर्शक यंत्रणा असण्यावर भर देण्यात येत आहे. बालकांच्या हक्काबद्दल माहिती देणे आणि त्यांच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी चिराग प विकसित करण्यात आले असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहायाने मुलांना सुरक्षित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे अध्यक्ष शाह यांनी सांगितले.

यासंदर्भातील जनजागृती साठी आवश्यक भित्तिपत्रिकेचे व मुलांच्या काळजी आणि संरक्षण नियमावलीत केलेल्या सुधारणा पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

पान ४ वरून पुढे...

## 'लग्नच नाही झालं...

गेले. या संबंधातून दोन मुलांचा जन्म झाला. त्यामुळे अधिकृतरित्या या मुलांना आपले नाव आणि आडनाव वापरण्याची मुभा दिली, असेही मुंडे यांनी या याचिकेत म्हटलं आहे.

करुणा शर्मा यांना आपला आधी एक विवाह झाला आहे, याची कल्पना होती. तरीही, त्यांनी स्वेच्छेने नातेसंबंध ठेवले, असा दावाही त्यांनी या याचिकेत केला आहे. त्यामुळे सत्र न्यायालय यावर काय निर्णय देते, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## श्रीमती कविता आसारामजी...

गायकवाड मॅडम या अतिशय प्रामाणिकपणे प्रशासकीय कार्य करत आहेत. त्या गोरगरिबाला व सर्व विद्यार्थिनीना,विद्यार्थी यांना सहाय्यक समाज कल्याण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व योजनेच्या माध्यमातून न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाच्या वतीने त्या सातत्याने प्रयत्न करत आहेत. त्यांच्या प्रयत्नाला यश देखील येत आहे. लोकांनी त्यांच्या मागील कार्यावर देखील एक प्रकारे चांगले समाधान व्यक्त केले आहे आणि आता त्या डायरेक्ट मा वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक म्हणून त्यांना प्रशासनाच्या वतीने पदोन्नती मिळाल्यामुळे सर्व नागरिकांमधून व सर्व विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांमध्ये आनंद व्यक्त करण्यात येत आहे व त्यांच्या मागील उत्कृष्ट कार्याचे कौतुक करून त्यांच्या हातून होणाऱ्या भविष्यातील अप्रतिम कार्यासाठी भरभरून मनस्वी त्यांना शुभेच्छा चा वर्षाव बीड जिल्ह्यातून सध्या होत आहे. याच पार्श्वभूमीवर आज त्यांची प्रत्यक्षात मा सहाय्यक समाज कल्याण आयुक्त कार्यालय येथे भेट घेऊन महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने व मा सहाय्यक समाज कल्याण आयुक्त कार्यालयाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करून व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान व सत्कार करण्यात आला या वेळी येथे उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे मा. श्री संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य तसेच महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक तथा दैनिक न्याय टाइम्स चे पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह येथे उपस्थित असलेले समाज कल्याण विभागातील अतिशय कर्तव्यदक्ष अधिकारी वयस श्री घुले साहेब, अंजली मोरे मॅडम, मनीषा गायकवाड मॅडम,मुमताज सौदागर मॅडम,श्री नितीन पतंगे सर तसेच समाज कल्याण विभागामध्ये अतिशय पारदर्शक समाज कल्याणचे प्रशासकीय कार्य करणारे सुरज हनवते सर, सुनील बनसोडे सर,बालाजी नागरगोजे सर,नितीनजी पवार सर, हेमंत जी कुलकर्णी सर, नितीनजी राठोड सर,दत्ता गोरे साहेब,प्रशांत उगले सर हे सर्व बीड जिल्हा मा.सहाय्यक समाज कल्याण आयुक्त बीड येथील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने मा वरिष्ठ सहाय्यक समाज कल्याण निरीक्षक श्रीमती कविता गायकवाड मॅडम यांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. त्यांना सर्वांच्या वतीने मनस्वी शुभेच्छा देऊन पुढील वर्षी त्या नक्कीच मा सहाय्यक समाज कल्याण आयुक्त या पदावर विराजमान होतील अशी अपेक्ष देखील या वेळी सर्व शुभेच्छा देणाऱ्याच्या वतीने येथे व्यक्त करण्यात आली.

पान ४ वरून पुढे...

## स्व.संतोष देशमुखांच्या...

डॉ.गणेश ढवळे आदि उपस्थित होते. स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळण्यासाठी मंत्री धनंजय मुंडे यांचा पोलिस प्रशासनावर दबाव असल्याने निष्पक्ष तपास होणार नसल्याने त्यांचा राजीनामा घ्यावा.अशी बीडकरांची मागणी होती.मात्र पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे एकंदरीतच बीडचे पालकमंत्री बीडमधील स्व.संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येप्रकरणी संवेदनशील असल्याचे दिसून आले नाही. मुख्यमंत्री यांनी मागील केल्यानंतर धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला. त्यामुळे आता नैतिकता म्हणून अजितदादा पवार यांनी बीड पालकमंत्री पदाचा राजीनामा देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे पालकमंत्री पद स्विकारावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## सरपंच संतोष...

शेकडो मराठा आंदोलक रस्त्यावर उतरुन मोटारसायकल रॅली काढत व्यावसायिकांना बंदचे आवाहन केले. व्यावसायिकांनीही आवाहनाला प्रतिसाद देत बाजारपेठ बंद केली. मोटारसायकल रॅली अर्ध्या तासात परत येण्याअगोदर संपुर्ण वडवणी शहर कडकडीत बंद झाले होते. मराठा आंदोलकांनी घटनेतील आरोपींविरुद्ध प्रचंड घोषणाबाजी करत मोटारसायकल रॅली काढल्याने संपूर्ण वडवणी शहरात एकच चर्चा होती. अचानक शहर बंद झाल्याने नागरिकांचे व प्रवाश्यांचे प्रचंड हाल झाले. एस.टी. वाहतुकही बंद होती.

पान ४ वरून पुढे...

## दोन महिन्यापासून...

कर्मचाऱ्यांचे निराधार योजनेच्या लाभार्थ्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. निराधार योजनेचे लाभार्थी हे अनुदानासाठी तहसील कार्यालय व बँकेत अनुदान जमा झाले का? याची विचारणा करण्यासाठी दररोज पायपीट करत आहेत. पण गेल्या दोन महिन्यांपासून त्यांना निराश होऊन परतावे लागत आहे.

## माळेवाडी ग्रामपंचायत...

उर्मिला नावडकर , कौशल्या नावडकर, कुशीवर्ता नरवडे, साईत्रा नावडकर, अनिता लोखंडे, , रंजना,मोरे,जयश्री तौर,गिता नरवडे,लता तौर, सुनिता भागवत ढगे (उप सरपंच), रमहानंदा राऊत, अरुणा थोरात, रुक्मिण ढगे, कालींदा ढगे, ज्योती नाईकनवरे , विजयमाला लोखंडे, सागर बाई लोखंडे,गोदाबाई लोखंडे, मनिषा पंडित,रुमन लोखडे, कमल मोरे, तुळसाबाई मोरे, सिताबाई लोखंडे, मुक्ताबाई लोखंडे,मुक्ताबाई लोखंडे, कमल लोखंडे, राधा खरात, चुतुराबाई लोखंडे,निता ढगे, अनिता नावडकर, आशाबाई लोखंडे, सुमन नावडकर, अंजना लोखंडे,कौसाबाई खेत्री , केसाबाई थोरात, मंगल नरवडे राजकन्या ठाकूरआदी महिलांनी घोषणा देत संमधीत मागण्याचे निवेदन दिले.आता सर्व अवैद्य धंदे मुळासगट बंद केल्या शिवाय आम्ही स्वस्त बसणार नाहीत आम्ही दोन दिवसापूर्वी बीड चे एस पी यांना ही याच संदर्भात निवेदन दिले आहे आम्ही कायम पाट पुरावा करत राहू वेळ प्रसंगी आमचे हे आंदोलन आणखीन तीव्र करू असे या गावाच्या प्रथम नागरी तथा सरपंच सौ जयश्री संजय नरवडे यांनी प्रतिनिधी शी बोलताना सांगितले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# वाचाल तर वाचाल !

## संस्कार प्राथमिकचे चिमुकले रमले वाचनालयात

**बीड । प्रतिनिधी**

वाचाल तर वाचाल असे म्हटले जाते परंतु वाचनाकडे आज कमालीचे दूर्लक्ष होत असताना संस्कार प्राथमिक विद्यालयाचे इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी वाचनालयास भेट दिली. पुस्तकाच्या खजिन्यात चिमुकले रममाण झाले. हे आशादायक चित्र आज ए एच वाडिया सार्वजनिक वाचनालयात दिसून आले. या बाबत अधिक माहिती अशी की,ए एच वाडिया सार्वजनिक वाचनालयाने विद्यार्थी भेटीचा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. विद्यार्थ्यांनी वाचनालयास भेट द्यावी, पुस्तके वाचावीत व त्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी असा त्यामागे उद्देश आहे. संस्कार प्राथमिक विद्यालयाच्या पहिली दुसरी विभागाच्या वाचनालय विभाग प्रमुख श्रीमती विद्या खवले यांनी यास प्रतिसाद देत इयत्ता दुसरीच्या शंभर विद्यार्थ्यांना ए एच वाडिया सार्वजनिक वाचनालयात नेले. वाचनालयाचे ग्रंथपाल गणेश शेंडगे, सहाय्यक ग्रंथपाल किशोर ठोसर आणि निर्गम सहाय्यक अशोक देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या वयोगटास अनुरूप पुस्तके विद्यार्थ्यांना वाचण्यास दिली. थोड्याच वेळात विद्यार्थी वाचनात दंग झाले. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती लीलाताई जाधव व ए एच वाडिया सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष डॉक्टर अनुराग पांगरीकर यांनी





विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विभाग प्रमुख श्रीमती विद्या पारगांवकर, श्री बडे सर विद्यार्थ्यां सोबत होते. यापासून प्रेरणा घेत याचे अनुकरण केले तर बंद पडत चाललेली वाचन संस्कृती पुनरूज्जीवीत व्हायला वेळ लागणार नाही

# वाल्मीक कराड सह सर्व आरोपींना फाशी देण्यात यावी : पिंगळे, बहीर, बडे शिंदे

## हा वाल्मीकि नाही तर वाल्या राक्षस आहे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राला हादरून सोडणारी मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होय. या प्रकरणा त पोलीस तपासामध्ये फोटो व व्हिडिओ व्हायरल झाल्यापासून मन सुन्न झाले आहे. संतोष देशमुख यांना मारहाण करताना आरोपींच्या चेहऱ्यावर जो असूरी आनंद होता तो त्यांच्या आकाच्या आशीर्वादामुळेच होता या प्रकरणातील प्रमुख आरोपी वाल्मीक कराड यांच्यासह सर्व आरोपींना फासी देण्यात यावी अशी मागणी युवासेना कार्यकारणी सदस्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षण विपुल पिंगळे, युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर , युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे , युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजित शिंदे , यांनी केली आहे.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण मागील तीन महिन्यापासून जिल्हा सह राज्यात गाजत आहे या प्रकरणात आता जे फोटो बाहेर आले आहेत त्यावरून असे दिसते की सरपंच संतोष देशमुख यांना अमानुष मारहाण करत मानवता कलंकित होईल असे कृत्य या आरोपींनी केले आहे. विशेष म्हणजे या सर्व गुन्ह्यामध्ये त्यांना साथ देणारा वाल्मीक कराड हाच मास्टर माईंड आहे. या सर्व आरोपींना तात्काळ फासावर लटकवावा यापुढे महाराष्ट्रात व बीड जिल्ह्यात अशा घटना करण्यास कुणीही धजावणार नाही. किळश येणाऱ्या घटनेची जेवढे निषेध करता येईल तेवढे कमीच आहे . मनात अत्यंत वेदना होत असून वाल्मीक कराड यांच्यासह सर्व आरोपींना फासावर लटकण्याची मागणी युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे , युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर , युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे , युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजित शिंदे , युवा सेनेचे वतीने करण्यात आली आहे.

# धारूर शहरातही कडकडीत बंद

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

मस्साजोग देशमुख हत्या प्रकरणी बीड जिल्हात बंद पुकारण्यात आला होता या बंदला प्रतिसाद म्हणून धारूर शहरातही कडकडीत बंद पाळण्यात आला व्यापाऱ्यांनी स्वतःहून आप आपले दुकाने बंद ठेवून या कृत्येचा निषेध व्यक्त केला. सर्वपक्षीय सर्व स्तरातील कार्यकर्ते नागरिकांनी बाजारपेठेत फिरून सर्वांना बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले होते या आव्हानाला व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देत या घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला आहे. मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती.



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होऊन आता जवळपास तीन महिन्यांचा कालावधी उलटला असून अजूनही एक मारेकरी बाहेर मोकाट फिरतोय. तर बाकीच्या आरोपींना मोक्का लावण्यात आला आहे. या निघृण हत्येने संपूर्ण राज्य हादरलं आहे.संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. याच दरम्यान काल रात्री देशमुख यांच्या हत्येचे काही फोटो आणि व्हिडिओ समोर आले आहेत. अत्यंत क्रूरतेने, आणि बेदमपणे मारहाण करून देशमुख यांचा जीव घेण्यात आला.त्यांच्या हत्येचे हे फोटो समोर आले असून सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले असून, त्यामुळे तालुक्यात संतापाची लाट उसळल्याचं दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर आज, मंगळवार ता. ०४ मार्च रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर किल्ले धारूर शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले होते.

# जागतिक ग्राहक दिनानिमित्त ग्राहकाची प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत: अनिल बोर्डे

**गेवराई । प्रतिनिधी**

१५ डिसेंबर हा जागतिक ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. त्यादिवशी जिल्ह्यातील सर्व कार्यालयातील ग्राहकाचे ,शेतकरी ग्राहकाचे जिल्ह्या स्तरावरील ,तालुका स्तरावरील तहसील कार्यालयातील शेतकरी ग्राहकाचे प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र चे उपाध्यक्ष तथा गेवराई ग्राहक पंचायत मार्गदर्शन केंद्र प्रमुख अनिल बोर्डे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केलेली आहे. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या माध्यमातून ग्राहकाच्या समस्या सोडविण्यासाठी हक्काचे बीड



जिल्ह्यात ग्राहक संरक्षण कक्षाची स्थापना होणे अत्यंत आवश्यक आहे . याबाबत बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या वतीने मा. जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन द्वारे मागणी केलेली आहे परंतु अद्याप पर्यंत जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना झालेली नाही तरी याबाबत १५ मार्च जागतिक ग्राहक दिनानिमित्त योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी या पत्रकाद्वारे करण्यात येत आहे. त्यामुळे विविध कार्यालयीन शासनाचे कामकाज शासन धोरणानुसार, गतिमान, पारदर्शक, मर्यादित कालावधी निपटारा होण्यासाठी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना होणे अत्यंत आवश्यक आहे याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करून कक्षाची स्थापना करावी अशी विनंती बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांच्यावतीने प्रसिद्धी पत्रका द्वारे करण्यात येत आहे.

# मिरकाळा येथे आज कृष्णा महाराज शास्त्री कीर्तन ; स्वररत्न अंजलीताई केंद्रे यांच्या भागवतकथेचा आज समारोप

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील मिरकाळा येथे सालाबाद प्रमाणे रोकडसिद्ध कृपेने व संतश्रेष्ठ भगवानबाबा व संतश्रेष्ठ वामनभाऊ यांच्या आशिर्वादाने दि.२७ ते फेब्रुवारी २०२५ पासुन अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. सप्ताहाच्या सातव्या दिवशी बुधवार दिनांक ०५ मार्च रोजी ह.भ.प. कृष्णा महाराज शास्त्री, उत्तराधिकारी भगवानगड यांचे कीर्तन होणार आहे. तर दिनांक ६ मार्च रोजी सकाळी ११.०० ते १.०० भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ.नामदेव शास्त्री




महाराज यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. मिरकाळा येथील अखंड हरिनाम सप्ताहात स्वररत्न, वाणीभूषण अंजलीताई केंद्रे यांच्या भागवत कथेचा आज बुधवारी समारोप होणार आहे.

# बालकीर्तनकार सोहम सातपुते यांचा आज होणार गौरव

**बीड । प्रतिनिधी**

अखिल प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा गुणगौरव सोहळा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे बुधवार ५ मार्च रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते बालकीर्तनकार सोहम सातपुते यांचा गौरव होणार आहे.

बालकीर्तनकार सोहम सातपुते यांनी आपल्या वाणीतून समाज प्रबोधन करण्याचे काम बाल वयात सुरू केले असून त्यांची दूरवर ख्याती पसरलेली आहे. बाल वयात त्यांच्या कीर्तनासाठी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. समाज प्रबोधनाचे काम करणारे सोहम



सातपुते यांचा आज बुधवार ५ मार्च रोजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष देविदास बसोदे यांच्या हस्ते पुरस्कार देवून सन्मान करण्यात येणार आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ स्तरीय महाविद्यालय अनुपस्थिती सर्वेक्षणाचा प्रशिक्षण वर्ग संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची प्रदेश कार्यकारणीची बैठक नुकतीच नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद येथे पार पडली. या बैठकीमध्ये महाविद्यालयांमधील वाढत जाणाऱ्या अनुपस्थितीचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय प्रदेश कार्यकरणीने पारित केला.

याच अनुषंगाने अभाविप देवगिरी प्रदेशाच्या वतीने महाविद्यालय अनुपस्थिती सर्वेक्षण ५ ते १५ मार्च या कालावधीमध्ये करण्यात येईल. हे सर्वेक्षण शैक्षणिक क्षेत्रातील प्रमुख ६ घटकांसाठी करण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य,पालक ,संस्थाचालक, विद्यापीठ अधिकारी यांचा समावेश असेल. देवगिरी प्रदेशात



येणाऱ्या ११ जिल्हे व प्रमुख ५ विद्यापीठांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर परिक्षेत्रातील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण बीड येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक महाविद्यालयात सोमवारी दि. ०३ मार्च रोजी पार पडले. या प्रशिक्षण वर्गामध्ये छ.संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव या जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते. या प्रशिक्षण वर्गामध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे देवगिरी प्रदेश अध्यक्ष प्रा.डॉ. सचिन कंदले, प्रदेश मंत्री कु. वैभवी ढिवरे, प्रदेश संघटन मंत्री श्री.सिद्धेश्वर जी लटपटे, प्रदेश सहमंत्री ऋषिकेश केकान, सर्वेक्षण प्रांत प्रमुख स्वप्नील बगाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदिनी रुईकर, संध्या बेहरे, राघवेंद्र कुलकर्णी, आशिष वारे, अजय शिंदे, तुषार घुले, सार्थक कडू आदी कार्यकर्त्यांनी कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी कार्य केले.

# महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी द्विवार्षिक निवडणूक; २७ मार्चला मतदान

**मुंबई । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणूक जाहीर केली आहे. महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे निवडून दिल्या जाणाऱ्या विधानपरिषदेच्या ५ जागा सदस्यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झाल्या आहेत. आमदार सर्वश्री आमश्या फुलाजी पाडवी यांचा विधानपरिषद सदस्य म्हणून ७ जुलै २०२८ पर्यंत कालावधी, प्रविण प्रभाकरराव दटके (१३ मे २०२६), राजेश उत्तमराव विटेकर - (२७ जुलै २०३०), रमेश काशिराम कराड - (१३ मे २०२६) आणि गोपीचंद कुंडलिक पडळकर यांचा कार्यकाळ समाप्ती १३ मे २०२६ असा आहे. मात्र या सदस्यांची दि. २३ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्र विधानसभा सदस्य म्हणून निवड झाल्याने भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेकरिता द्वैवार्षिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. या निवडणुकीसाठी सोमवार, १० मार्च २०२५ रोजी अधिसूचना जारी केली जाईल. सोमवार, १७ मार्च, २०२५ पर्यंत उमेदवारांना नामांकन अर्ज दाखल करता येईल. उमेदवारांनी दाखल केलेल्या नामांकन अर्जांची छानणी मंगळवार, १८ मार्च, २०२५ रोजी केली जाईल, तर नामांकन अर्ज मागे घेण्याची मुदत गुरूवार, २० मार्च, २०२५ अशी आहे. गुरूवार, २७ मार्च, २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत या निवडणुकीसाठी मतदान होईल. तर त्याच दिवशी ५ वाजेनंतर मतमोजणी करण्यात येईल. ही संपूर्ण प्रक्रिया दिनांक २९ मार्च, २०२५ पर्यंत पूर्ण होईल, असे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# कृष्णा हॉस्पीटलमध्ये हाडांसाठी भव्य मोफत शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

येथील डॉ.मनोज मुंडे यांच्या कृष्णा हॉस्पीटलमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त हाडाची ठिसुळता (ऑस्टिओपोरोसीस) मोफत तपासणी शिबीर येत्या शनिवार दि ८ मार्च २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ५ वाजेपर्यंत आयोजीत केले आहे त्याचा लाभ घेण्याचे आवाहन हॉस्पीटलच्या वतीने करण्यात आले आहे.पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, हाडाची ठिसुळता (बीएमडी) ही वयाच्या चाळीशीनंतर स्त्री व पुरुष या दोघांमध्ये आढळते. हाडाची ठिसुळता म्हणजे हाडांतील कॅल्शिअम कमी होवून हाडे ठिसुळ व कमकुवत बनतात आणि यामुळे पुढे वरचेवर फ्रॅक्चर व सांधेदुखीचे वयाबरोबर वाढलेले प्रमाण वाढते. सदरील शिबिर कृष्णा हॉस्पीटल, विद्यानगर बीड येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी ७०२०५९०७८८ वर संपर्क करावा.

# श्यामराव थोरात गुरुजी समतेचे सारथी-डॉ. सुखदेव थोरात (विद्यापीठ अनुदान आयोग अध्यक्ष ) केज येथे गौरव ग्रथ प्रकाशन सोहाळा थाटात संपन्न

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मौजे मांगवडगाव येथील रहिवाशी असणारे शामराव थोरात गुरुजी हे समाजासाठी एक आदर्श व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांचे योगदान विशेषतः ग्रामीण शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय राहिले आहे. याच बाबींवर प्रकाश टाकण्यासाठी कार्य गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळ्याचे आयोजन दि.२ मार्च २०२४ रोजी जे.के फक्शन हॉल फुलेनगर केज येथे करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन विद्यापीठ अनुदान आयोगचे अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात तर प्रमुख पाहुणे म्हणुन जेष्ठ साहित्यिक योगिराज वाघमारे तसेच विचारवंत काळोखे हे होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या व कालकथित श्यामराव थोरात गुरुजी यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आल्या नंतर अध्यक्ष तथा प्रमुख पाहुण्यांचा सत्कार स्वागत करण्यात आले. यावेळी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जर्मनी येथे नौकरीस लागलेल्या कु. शिवानी बचुटे हिचा



संयोजकाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यानंतर श्यामराव थोरात गुरुजी यांच्या जीवन कार्यावर प्रकाशन टाकनारा कार्य गौरव ग्रंथ समतेचा शिलेदार या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. वसंत ओगले यांनी केले .त्यानंतर गुरुजींच्या सोबत सर्व स्तरावर कार्य करणाऱ्यांनी आपले विचार व्यक्त करून कालकथित श्यामराव थोरात गुरुजी यांच्या आठवणी जिवंत केल्या मान्यवरांच्या मनोगतानंतर अध्यक्षीय समारोपात समतेचा शिलेदार श्यामराव थोरात गुरुजी अष्टपैलु व्यक्तिमत्व यावर डॉ. सुखदेव थोरात यांनी मनोगत व्यक्त केले . सदरील कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन प्रज्ञा जाधव हिने केले तर आभार ड सचिन थोरात यांनी मानले . या कार्यक्रमाचे आयोजन गौरव ग्रंथ समितीचे अध्यक्ष डॉ. अशोक मुजमुले, सचिव डॉ .ओमप्रकाश नायर तसेच गौरव ग्रंथाचे मुख्य संपादक प्रा. प्रकाश सिरसाठ यांनी केले होते. कार्यक्रमास मोठ्या संख्येने जनसुमुदाय उपस्थित होता. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. नगसेवक कपिल मस्के , दै. वादळ वार्ताचे संपादक अजय भांगे , नयुम शेख , विलास पवळे, निशांत जाधव, रोहित थोरात , राहुल शिंदे आदिनी परिश्रम घेतले.

# बोरीसारगाव येथे सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेतील गटांचा स्नेह मेळावा

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील बोरीसावरगाव येथे सत्यमेव जयते फार्मर कप स्नेह मेळावा मंगळवार रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच वैजनाथ देशमुख, प्रमुख मार्गदर्शक पानी फाउंडेशनचे मराठवाडा समन्वयक संतोष शिनगारे,प्रमुख उपस्थिती उपसरपंच बाळासाहेब यादव, डॉ हनुमंत सौदागर आदींची होती. सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेत तालुक्यातून उत्कृष्ट काम करणाऱ्या शेतकरी गटांचा उपस्थितांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना संतोष शिनगारे म्हणाले ज्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला.ते सर्वच गट जिंकलेलो आहात.

सर्व गटांचा उत्साह यांच्या चेहऱ्यावर विजय दाखवत आहे असे मत व्यक्त केले. सेंद्रिय आणि विषमुक्त अन्न ही काळाची गरज असल्याचे मत डॉ सौदागर यांनी व्यक्त केले. स्नेह मेळाव्यासाठी



बहिणाबाई महिला शेतकरी गट दिपेवडगाव,राजमाता जिजाऊ महिला शेतकरी गट लाडेगाव,संघर्ष महिला शेतकरी गट लाडेगाव, ज्ञानेश्वरी महिला शेतकरी गट लाडेगाव, आदिशक्ती महिला शेतकरी गट चंदनसावरगाव ,भुमिपुत्र शेतकरी गट चंदन सावरगाव ,कृषीसखी महिला शेतकरी गट चंदन सावरगाव जय किसान महिला शेतकरी गट कानडी बदन ,जय किसान पुरुष शेतकरी गट कानडी बदन, दत्तकृपा महिला शेतकरी गट , हिरकणी महिला शेतकरी गट आडस, माऊली शेतकरी गट आडस, उत्तरेश्वर महिला शेतकरी गट हनुमंत पिंपरी, सावित्रीबाई फुले महिला शेतकरी गट , बोरीसावरगाव, शंभु महादेव शेतकरी गट बोरीसावरगाव, ,तृण अंकुर शेतकरी गट पाथरा आदी शेतकरी गटांचा सन्मान करण्यात आला. यावेळी गटातील शेतकऱ्यांना आलेले सुंदर अनुभव कथन करण्यात आले.महिला शेतकरी गटांनी उत्स्फूर्तपणे अनुभव कथन करताना शेतीत आनंदाने काम केले असल्याचे अनुभव सांगितले. उत्पादन वाढले हेच सर्वात मोठे बक्षीस असल्याचे प्रतिक्रिया गट सदस्यांनी दिल्या. पानी फाउंडेशनचे नितीन पाटोळे,सिद्धार्थ गवळे,महेश गूळभिले उपस्थित होते कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रशिक्षक विनोद ठोंबरे, तालुका समन्वयक हरिश्चंद्र पांचाळ यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमास गटातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CMYK

दैनिक मराठवाडा पत्र


# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील सदस्यांना शासन सर्वतोपरी मदत करेल : अँड. निलेश हेलांडे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांनी खचून न जाता पुन्हा ताकतीने उभे करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे याचाच एक भाग म्हणून मौजे पिंपळवाडी तालुका बीड येथे आत्महत्याग्रस्त दादाराव आश्रुबा बहिरवाल यांच्या कुटुंबाला भेट देताना कैलासवासी वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशनचे अध्यक्ष अँड निलेश हेलांडे पाटील (राज्यमंत्री दर्जा)यांनी असे



प्रतिपादन केले यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बीड श्री सुभाष साळवे तालुका कृषी अधिकारी बीड अशोक साळी महिला व बालविकास चे मन्सुरी ए एन व मंगेश जाधव उपस्थित होते. पिंपळवाडी येथील दादाराव अश्रुबा बहिरवाल यांच्या कुटुंबाची पूर्ण माहिती जाणून घेतली यावेळी त्यांची मुलगी वैशाली बहिरवाल हिच्या स्पर्धे परीक्षेसाठी मदत करण्याचे तसेच मुलगा वैभव बहिरवाल यास महिला व बालविकास मार्फत चार हजार रुपये महिन्याला अनुदान देण्याची कार्यवाही करण्यात आली तसेच कृषी विभागाकडून आगामी हंगामात प्रात्यक्षिके व इतर मदत करण्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री सुभाष साळवे यांनी अश्वासित केले. स्पर्धा परीक्षा अर्कॅडमी ची एक वर्षाची फीस बाबतही मदत करण्याबाबत चर्चा झाली. तसेच तहसीलमार्फत घरकुल तात्काळ मंजूर करून देण्याबाबत सूचित केले शासन आपल्या विविध योजनेच्या माध्यमातून आत्महत्याग्रस्त कुटुंबातील सदस्यांना सहयोग देण्यासाठी सतत प्रयत्नशील राहील अशी ग्वाही यावेळी हेलांडे पाटील यांनी दिली यावेळी त्यांचे स्वीस सहाय्यक कृष्णकुमार देठे गावचे सरपंच शोभा बहिरवाल सुभाष बहिरवाल मंडळ अधिकारी महादेव जायभाये महसूल अधिकारी अरडकर मॅडम कृषी पर्यवेक्षक प्रशांत नाळपे ज्ञानदेव जांभळकर कृषी सहाय्यक बाळासाहेब आगाव कम लाकर शिंदे सह गावकरी उपस्थित होते.

# 'लग्नच नाही झालं, तर बायको कशी ?

## करुणा मुंडे पोटगी प्रकरणात धनंजय मुंडेंचं वरच्या कोर्टात अपील

**बीड । प्रतिनिधी**

धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा ( करुणा मुंडे) यांच्यासोबत भावनिक आणि मानसिक हिंसाचार केल्याचं म्हणत त्यांना पोटगी खर्च देण्याचे आदेश काही दिवसांपूर्वीच दंडाधिकाऱ्यांनी दिले होते. या आदेशाला आता धनंजय मुंडे यांनी सत्र न्यायालयात आव्हान दिले आहे. दंडाधिकाऱ्यांनी दिलेला आदेश अयोग्य आहे, असं त्यांनी या पूर्नविचार याचिकेत म्हटलं आहे. एकीकडे



आज धनंजय मुंडे यांनी त्यांच्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे, तर दुसरीकडे करूणा शर्मा यांच्या आरोपांतून सुटण्यासाठी त्यांनी सत्र न्यायालयात धाव घेतली आहे. करुणा शर्मा यांच्याशी आपला कधीही विवाह झाला नाही, त्याम ुळे हा निर्णय चुकीचा आहे, असं त्यांनी त्यांच्या पूर्नविचार याचिकेत म्हटलं आहे. त्यामुळे आता विविध चर्चाही सुरु झाल्या आहेत. आपला आणि करुणा शर्मा यांचा विवाह झाला आहे. त्यामुळे आम च्यात घरगुती संबंध आहेत, हा दंडाधिकाऱ्यांनी काढलेला निष्कर्ष अयोग्य आहे. दंडाधिकाऱ्यांनी सारासार विचार न करताच अंतरिम देखभालीचा खर्च देण्याचा आदेश दिले आहेत, असा युक्तिवाद त्यांनीही या याचिकेत केला आहे. याशिवाय पक्षाच्या कामानिमित्त करूणा शर्मा यांच्याशी ओळख झाली. वारंवार झालेल्या भेटीगाठी आणि संवादातून वैयक्तिक संबंध निर्माण झाले. सहमतीने ते संबंध पुढे ▶▶ उर्वरित पान २ वर

# श्रीमती कविता आसारामजी गायकवाड यांची वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक या पदावर पदोन्नती निमित्त सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामधून सर्वत्र कविता गायकवाड यांच्या उत्कृष्ट कार्यांच्या बाबतीत समाधान व्यक्त करून त्यांची मा वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक या पदावर पदोन्नती झाल्याबद्दल सर्वत्र शुभेच्छा चा वर्षाव होत आहे. लोकशाही पत्रकार संघच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला आहे .यावेळी सं. अ. बीबी वैद्य, बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी, भगवान विद्यालयाचे शिक्षक डवरे सर सह समाजकल्याण विभागाचे कर्मचारी उपस्तित होते.



श्रीमती कविता आसारामजी गायकवाड यांच्या प्रशासकीय कार्याच्या बाबतीत जर विचार केला तर अतिशय कौतुकास्पद कार्य असल्याचे बोलले जाते. त्यांची ज्यावेळेस प्रशासकीय सेवेमध्ये नियुक्ती झाली त्यावेळेस त्या जिल्हा सोलापूर येथे अतिशय प्रामाणिकपणे समाज कल्याण विभागाचे त्या काम करत होत्या. त्याच्या चांगल्या कामाची एक चांगली पावती म्हणून आणि एक म्हणून बीड येथे त्यांना समाज कल्याण निरीक्षक या पदावर नियुक्ती शासनाच्या वतीने त्यांना मिळाली. त्या नंतर आता त्यांना मा सहाय्यक समाज कल्याण वरिष्ठ निरीक्षक म्हणून त्यांची प्रशासकीय पदोन्नती झाल्यामुळे आता बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांच्या सम ाज कल्याण विभागामध्ये येणाऱ्या लाभार्थ्यांच्या अशा मोठ्या उंचावल्या आहेत. कारण कविता ▶▶ उर्वरित पान २ वर

# स्व.संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या; लिंबागणेशकरांनी उत्स्फूर्त बंद पाळला





**लिंबागणेश । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांना अमानुषपणे मारहाण करताचे व्हिडिओ आरोपीने काढल्यानंतर ते व्हिडिओ सीआयडीने रिकव्हर करीत त्यातील स्क्रीन शाट चार्जशीटला जोडले आहेत.आता हे स्क्रीन माध्यामांच्या हाती लागले असुन ते फोटो माध्यमांनी प्रकाशित केल्यानंतर सर्वसामान्य माणसांचे मन हेलावून गेले असुन संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला आहे.संतोष देशमुखांचा अमानुष छळ करून मृतदेहाची विटंबना केल्याने जनसामान्यांत संतापाची लाट उसळली आहे. बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील सर्व समाजातील ग्रामस्थांनी आज दि.४ मंगळवार रोजी सर्व दुकाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवत गावच्या वेशीवर स्व.संतोष आण्णा देशमुख अमर रहे मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशा घोषणा देत उत्स्फूर्त बंद पाळला. यावेळी राजेभाऊ गिरे,पांडुरंग वाणी, बाळकृष्ण थोरात, साहेबराव निर्मळ, अशोक वाणी,विनायक मोरे,दशरथ दाभाडे, विठ्ठल कदम, दिनेश जाधव, महेश ढवळे, बाजीराव नाईगडे, रामकिसन गिरे, अमोल साळवे, अर्जुन घोलप,रवी वायभट, हरिओम क्षीरसागर,

▶▶ उर्वरित पान २ वर

# सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी वडवणी शहर कडकडीत बंद

## मराठा आंदलकांकडुन मोटारसायकल रॅली काढत व प्रचंड घोषणाबाजी करत केले बंदचे आवाहन





**वडवणी । प्रतिनिधी**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी पोलिसांनी न्यायालयात जे चार्जशीट दाखल केले आहे. त्यातील फोटो आणि काही व्हिडिओ प्रसार माध्यमांनी प्रसारीत केल्यानंतर प्रचंड आक्रोश पहायला मिळाला. त्याचाच निषेध म्हणून आज वडवणी शहरात मराठा आंदोलक रस्त्यावर उतरुन बंदचे आवाहन केले आणि अर्ध्या तासात संपूर्ण वडवणी शहर बंद झाले. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात दोन दिवसांपुर्वी पोलीसांनी न्यायालयात चार्जशीट दाखल केले. त्या चार्जशीट मधील काही फोटो व व्हिडिओ प्रसार माध्यमांवर प्रसारीत होताच मराठा आंदोलक संतप्त झाले. तर काहींनी आपल्या अश्रुंना वाट मोकळी करून दिली. त्याच घटनेचा निषेध म्हणून सकाळी ९:३० वाजता

▶▶ उर्वरित पान २ वर

# दोन महिन्यापासून निराधारांचे अनुदान रखडले

## तहसील व बँकेच्या दारात माराव्या लागतात चकरा

**गेवराई । प्रतिनिधी**

निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना गेल्या दोन म हिन्यापासून अनुदान मिळालेले नाही. होळी– धुलीवंदन सण तोंडावर आहे. त्यामुळे निराधारांच्या हक्काचे अनुदान त्यांना मिळणार का ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. तर लाडकी बहीण योजनेचे लाभार्थी तुपाशी व निराधार योजनेचे लाभार्थी उपाशी या चर्चेला सर्वत्र उधाण आले आहे. गेवराईचे तहसीलदार खोम णे साहेबांनी लक्ष द्यावें आणि तसेच लाभार्थ्यांचे अनुदान महिन्याकाठी देण्यात यावे, अशीही मागणी होत आहे.



या योजनेच्या लाभार्थ्यांचे अनुदान मागील दोन महिन्यांपासून रखडले आहे. लाभार्थी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना योजना सुरू झाल्यापासून तातडीने दर म हिन्याला मानधन दिले जाते. परंतु, निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदानअभावी शासनाने अडचणीत आणले आहे. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन, या योजनांचा गेवराई तालुक्यातील अनेक निराधार लाभार्थी लाभ घेत आहेत. ज्यांना दोन महिन्यांपासून अनुदान मिळाले नाही, अशा लाभार्थ्यांनी काय करावे? कसे जीवन जगावे? कशाप्रकारे आपल्या औषधांची सोय करावी? असे अनेक प्रश्न त्यांच्यासमोर उभे ठाकले आहेत. तहसील कार्यालय व बँकेच्या माराव्या लागतात चकरा ते भलेही करतात नखरा शासनाचे व अधिकारी,

▶▶ उर्वरित पान २ वर

# माळेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील अवैद्य दारु व अवैद्य धंदे बंद करा

## सरपंच सह शेकडो महिलांचा माजलगाव तहसीलवर मोर्चा !

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील माळेवाडी (सुलतानपूर) येथील ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांचे संसार उध्वस्त करणाऱ्या हद्दीतील अवैद्य दारू व अवैद्य धंदे कायमस्वरूपी बंद करून या धंद्याला प्रोत्साहन देणाऱ्यावर कडक कार्यवाही करण्यासाठी काल गावचे सरपंच जयश्री नरवडे आणि त्यांच्या समवेत शेकडो महिलाचा येथील तहसीलवर मोर्चा धडकला

या परिसरात अवैद्य दारू ,मटका ,गुटखा व जुगार अड्डे बोकाळले असून या धंद्याच्या विळक्यात येथील शेतकरी ,कष्टकरी ,तरुणाई आणि सर्वसाम ान्य नागरिक अडकत आहे या मुळे घरा घरात भांडण तंटे निर्माण होऊन अनेकांचे संसार उध्वस्त झाले असल्याने या ठिकाणी चे




सर्व अवैद्य धंदे तात्काळ बंद करून या सर्वांवर कडक कार्यवाही करावी अशी मागणी घेऊन काल दि ४ रोजी दुपारी १ वा माळेवाडी (सुलतानपूर) येथील सरपंच जयश्री नरवडे यांच्या सह गावातील संजना लोखंडे, आशाताई लोखडे,

▶▶ उर्वरित पान २ वर







*गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ तलवाडा कडकडीत बंद पाळण्यात आला होता*

# मौजे निमगाव मायंबा 'लमाणतांडा' ला महसूली गावात रूपांतर करण्याची अधिसूचना जारी

**बीड । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यातील मौजे निमगाव मायंबा अंतर्गत असणाऱ्या लमान वाडी तांडा क्रमांक दोन ला लमान तांडा अधिसूचना रद्द करून महसुली गावात रूपांतरित करण्याची अधिसूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जाहीर केली आहे. परिशिष्टामध्ये प्राथमि क स्वरुपात प्रसिध् करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी यांनी पाठविलेल्या अधिसूचनेमध्ये नम ूद केले आहे. सोबत अधिसूचनेचे परिशिष्ट यादी खालील प्रमाणे आहे.

CMYK